दैनिक
# शुभ प्रभात
SHUBH PRABHAT
एक नव्या युगाचा आरंभ...
विभागीय वृत्तपत्र
www.shubhprabhat.co.in
E-Mail : dainikshubhprabhat@gmail.com
Marathwada : Volume No. 01, Issue No. 311, Marathi Daily Wednesday, Date - 20 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4 PRGI Reg. No. - MHMAR/25/A1228
मराठवाडा अवृत्ती | वर्ष १ ले | अंक ३११ वा | मराठी दैनिक | बुधवार दि. २० मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४ ABD/544/2025-2027

## वाळू माफियांच्या धाकाने पोलीस अधीक्षक कार्यालयात घेतला आश्रय

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील शिरसवाडी येथे वाळू माफियांच्या कथित दहशतीमुळे एक कुटुंब भयभीत झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सततच्या त्रासाला कंटाळून आणि जीवाला धोका असल्याच्या भीतीने वसंत वाघमारे यांच्या कुटुंबाने थेट मध्यरात्री पोलीस अधीक्षक कार्यालय गाठत तेथेच आश्रय घेतल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिरसवाडी येथील रहिवासी वसंत वाघमारे यांच्या कुटुंबाला गेल्या काही दिवसांपासून काही वाळू माफियांकडून सतत त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. घरातील महिलांना वारंवार त्रास देणे, घरासमोर येऊन विचित्र हावभाव करणे, तसेच कुटुंबातील पुरुष सदस्यांना मारहाण करणे असे प्रकार घडत असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

या प्रकरणी घरातील एका महिलेच्या फिर्यादीवरून दोन वेळा (पान २ वर...)

नामांकित फूड डिलीव्हरी कंपनीला
डिलीव्हरी बॉय पाहिजे!
25 ते 30 हजार रुपये कमविण्याची संधी
मिनिमम गॅरंटी 10,000 रुपये
अधिक कमिशन सुद्धा
पात्रता : हिंदी, मराठी, इंग्रजी वाचता यावी
कागदपत्रे : आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, गाडी असल्यास आरसी बुक, ड्रायव्हिंग लायसन्स
संपर्क : 7558412574
इंडीयन फास्ट डिलिव्हरी पार्टनर ॲप डाउनलोड करा आणि रजिस्ट्रेशन करून जॉब सुरु करा!
INDIAN FAST DELIVERY PARTNER
स्थिर कमाई | स्वतंत्र कामाची संधी | अधिक कमाईची संधी

प्रोप्रा. अच्युतराव मोरे पाटील Since 1980
MORE SUPER SHOP
More Quality Is Our Identity
Haldiram's
आमच्याकडे सर्व प्रकारचा किराणा, हल्दीराम चे स्विट अँटम व अमूल आइसक्रीम डिस्काउंट व होलसेल दरात मिळेल.
घरपोच सुविधा उपलब्ध.
9373840732
शिवसदन अपार्टमेंट, कृष्णा मॉलच्या पाठीमागे, रिंग रोड, जालना

# वसतीगृह की भग्न इमारत?

## सामाजिक न्याय विभागाचा निष्काळजीपणा; मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नरकयातना

**अच्युत मोरे/स्पेशल रिपोर्ट**

**जालना शहरातील संत रामदास शासकीय मुलांचे वसतीगृह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृह यांची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जीवनाशी अक्षरशः खेळ सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना नरकयातना सहन कराव्या लागत असून, वसतीगृह नावापुरतेच उरले आहे की काय असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.**



पावसाळा तोंडावर आला असताना या वसतीगृहांच्या इमारती पूर्णपणे गळक्या बनल्या आहेत. छतांमधून पाणी थेट विद्यार्थ्यांच्या खोल्यांमध्ये झिरपत असून, अनेक खोल्यांमध्ये पावसाचे पाणी साचत आहे. काही ठिकाणी खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहेत तर काही ठिकाणी खिडक्याच अस्तित्वात नाहीत. परिणामी विद्यार्थी कपडे, गोण्या, चिंध्या बांधून पावसापासून आणि मच्छरांपासून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही परिस्थिती एखाद्या सरकारी वसतिगृहाची नसून भग्नावस्थेतील इमारतीची असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

उन्हाळ्यात असह्य उकाडा, पावसाळ्यात गळणारे छत आणि हिवाळ्यात बोचरी थंडी अशा तिहेरी संकटात विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू आहे. अनेक खोल्यांतील पंखे बंद अवस्थेत असून दरवाज्यांची अवस्था देखील बिकट आहे. मूलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव असूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

विशेष म्हणजे, गेल्या चार वर्षांपासून हीच परिस्थिती कायम असून प्रशासनाला वारंवार निवेदने, विनंत्या करूनही साधी खिडकी बदलण्याइतकी संवेदनशीलता संबंधित विभागाने दाखवलेली नाही. विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून घेण्याऐवजी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून होत आहे.

जालना जिल्ह्यालगतच मराठवाड्याचे सामाजिक न्याय मंत्री असतानाही जिल्ह्यातील शासकीय वसतीगृहांची ही भयावह अवस्था अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. अधिकाऱ्यांच्या कार्यालयांच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपयांचा निधी सहज उपलब्ध होतो, (पान २ वर...)

## राजकीय नेते आणि विद्यार्थी संघटनाचे मौन का?

जालना येथील संत रामदास शासकीय मुलांचे वसतीगृह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृहाची अवस्था पाहिली तर शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा खरा चेहरा समोर येतो. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात, मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राहण्यासाठी सुरक्षित आणि सन्मानजनक व्यवस्था देण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या खोल्यांमध्ये पावसाचे पाणी गळते, खिडक्या नाहीत, पंखे बंद आहेत, मूलभूत सुविधा गायब आहेत आणि तरीही प्रशासन शांत बसले आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

गरज नसताना अधिकाऱ्यांच्या दालनांच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपयांचा निधी उपलब्ध होतो, मग गरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी निधी का (पान २ वर...)


## मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे काय म्हणून दुर्लक्ष?

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांची अवस्था अत्यंत भीषण झाली असताना स्वतःला चळवळीचे नेते म्हणवणारे राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थी संघटना मात्र पूर्णपणे गप्प आहेत. विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नाहीत, पावसात खोल्या गळत आहेत, खिडक्या तुटलेल्या आहेत, तरीही त्यांच्या प्रश्नांसाठी कोणी रस्त्यावर उतरायला तयार नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.

विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी साधे निवेदन देण्याचीही तसदी अनेकांनी घेतलेली (पान २ वर...)

## खंजर घेऊन दहशत माजवणारा गुन्हेगार जेरबंद

जालना । प्रतिनिधी



जालना शहरातील जुना जालना परिसरात हातात धारदार खंजर घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या एका गुन्हेगाराला कदीम जालना पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले असून त्याच्याकडून धारदार खंजर जप्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १९ मे २०२६ रोजी सकाळी ९.३८ वाजेच्या सुमारास जुना जालना येथील अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळील शिवकुमार संकुल परिसरात एक व्यक्ती हातात चाकू घेऊन एका व्यक्तीला मारहाण करण्यासाठी फिरत असल्याची माहिती आपत्कालीन दूरध्वनी क्रमांकाद्वारे पोलिसांना मिळाली होती.

माहिती मिळताच कदीम जालना पोलीस ठाण्याचे पथक तातडीने सरकारी व खासगी वाहनाने घटनास्थळी रवाना झाले. सकाळी ९.४५ वाजता पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले असता एक इसम हातात धारदार खंजर घेऊन मोठमोठ्याने ओरडत परिसरात दहशत निर्माण करत असल्याचे दिसून आले. तसेच तो कोणावर तरी प्राणघातक हल्ला करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचा संशय पोलिसांना आला.

पोलिसांनी शिताफीने संबंधित इसमाला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव विरेंद्र लक्ष्मणराव (पान २ वर...)

## साडेचार लाखांची अवैध लोखंडी सळई जप्त

### नागेवाडी टोलनाका परिसरात चंदनझिरा पोलिसांची धाड

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेंतर्गत चंदनझिरा पोलिसांनी नागेवाडी टोलनाका परिसरात मोठी कारवाई करत अवैधरित्या लोखंडी सळई विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर धाड टाकली. या कारवाईत विविध कंपन्यांची तब्बल ४ लाख ४९ हजार ९०० रुपयांच्या लोखंडी सळई जप्त करण्यात आल्या आहेत.



पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना दिल्या आहेत. त्यानुसार दि. १८ मे २०२६ रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी विशेष पथक तयार करून गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली.

छत्रपती संभाजीनगर-जालना मार्गावरील नागेवाडी टोलनाका परिसरात अवैधरीत्या लोखंडी सळई विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने नवनाथ पांडुरंग गवळी (रा. चंदनझिरा, जालना) याच्या ठिकाणी छापा टाकला. (पान २ वर...)

## बाबुराव गणपतराव मोहिते यांचे निधन

येथील रहिवासी आणि मोहिते परिवाराचे ज्येष्ठ मार्गदर्शक कै. पै. बाबुराव गणपतराव मोहिते (वय ८० वर्षे) यांचे शुक्रवार, दिनांक १९ मे २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात भरत, गणेश, शंकर, विजय, अजय ५ मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. ते अतिशय मनमिळावू आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते.

त्यांच्या निधनाने मोहिते परिवारावर शोककळा पसरली असून, विविध क्षेत्रांतून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली जात आहे. कै. पै. बाबुराव गणपतराव मोहिते यांच्या पार्थिवावर सकाळी ठीक ९:०० वाजता (पान २ वर...)

## थोडक्यात...

### जालना जिल्ह्यात पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपांवर पेट्रोलचा साठा तात्पुरता उपलब्ध नसल्याने काही ठिकाणी पंप बंद ठेवण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण होत असून, अनेक वाहनधारक आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात पेट्रोल व डिझेल भरून घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने दिलेल्या निर्देशांनुसार संबंधित तेल कंपन्या आणि पेट्रोल पंप चालकांशी समन्वय साधून पेट्रोल व डिझेलचा पुरवठा नियमित ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होऊ नये यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस प्रशासनाच्या मदतीने नियोजन करण्यात येणार आहे. यासोबतच स्थानिक वृत्तपत्रे, सोशल मिडिया आणि इतर माध्यमांद्वारे अधिकृत व सत्य माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे.

कोणत्याही प्रकारची अफवा, चुकीची माहिती किंवा घबराट निर्माण करणारे संदेश पसरवू नयेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल आणि डिझेल पंपांवर तात्काळ तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या मोहिमेद्वारे इंधन साठा, विक्री आणि वितरणाची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

कोणत्याही पेट्रोल पंप चालकाकडून जाणीवपूर्वक साठेबाजी, कृत्रिम टंचाई निर्माण करणे, जादा दराने विक्री करणे अथवा नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल असे प्रकार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकरणांमध्ये जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच इतर लागू कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## कथित ढिसाळ नियोजनामुळे बौद्ध भाविक संतप्त

### बोधगया ऐवजी इतर मंदिरांचे दर्शन घडवल्याचा आरोप

जालना । प्रतिनिधी

रेल्वेच्या पर्यटन विभागामार्फत आयोजित धम्म यात्रेदरम्यान बौद्ध भाविकांनी आयआरसीटीसी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना नियोजित स्थळांऐवजी इतर मंदिरांमध्ये नेले जात असल्याचा आरोप यात्रेकरूंनी केला आहे. या प्रकारामुळे भाविकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी व्हिडिओद्वारे आपली व्यथा मांडत न्यायाची मागणी केली आहे.

भाविकांच्या म्हणण्यानुसार, ही यात्रा



विशेषतः बोधगया, राजगीर, वेणूवन यांसारख्या ऐतिहासिक आणि धार्मिक बौद्ध स्थळांच्या दर्शनासाठी आयोजित करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात प्रशासनाकडून त्यांना विष्णू मंदिर, शंकर मंदिर यांसारख्या इतर धार्मिक स्थळांकडे नेले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आम्ही बौद्ध धम्म स्वीकारला असून आम्हाला केवळ बौद्ध स्थळांचेच दर्शन हवे आहे, अशी स्पष्ट भूमिका भाविकांनी मांडली आहे.

यात्रेदरम्यान प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचाही सामना करावा लागत असल्याचे समोर आले आहे. बिहारमध्ये वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. अनेक महिला भाविकांनी उन्हात केवळ गरम पाणी उपलब्ध होत असल्याचे सांगत नाराजी व्यक्त केली. (पान २ वर...)

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर खासदारांना बोलू दिले नसल्याने कॉंग्रेस आक्रमक; तहसीलदारांना निवेदन

जालना । प्रतिनिधी

जालना तालुका कॉंग्रेस आणि किसान कॉंग्रेसच्या वतीने आज तहसीलदार छाया पवार यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आयोजित बैठकीत खासदार डॉ. कल्याण काळे यांना बोलण्यास मज्जाव करण्यात आल्याच्या निषेधार्थ हे निवेदन देण्यात आले.

दि. १९ मे रोजी सकाळी ११ वाजता तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष कृष्णा पडूळ आणि किसान कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष नारायण वाढेकर यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. दि. १५ मे रोजी खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस पालकमंत्री संजय सिरसाट अध्यक्षस्थानी होते.

बैठकीदरम्यान खासदार डॉ. कल्याण काळे



हे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आपली भूमिका मांडत असताना त्यांना बोलण्यास मज्जाव करण्यात आल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. मी शेतकऱ्यांसाठी संवैधानिक मार्गाने प्रत्येक बैठकीत त्यांचे प्रश्न मांडणारच, अशी ठाम भूमिका खासदार काळे यांनी व्यक्त केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी सोपान तिरुखे, गणेश खरात, भाऊसाहेब लकडे, ॲड. (पान २ वर...)

## गुटखा कारवाईत 'सेटलमेंट'ची चर्चा; जप्त साठा कमी दाखवल्याचा संशय

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात गुटखा विक्रेत्यांवर झालेल्या अलीकडील कारवायांनंतर आता पोलिसांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. जालना शहरातील जुना जालना परिसरातील कुचरवटा भागात तसेच घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या कारवायांदरम्यान मोठ्या प्रमाणावर गुटख्याचा साठा आढळूनही तो कमी दाखवून अर्थपूर्ण व्यवहार करण्यात आल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रांजणी येथील कारवाई अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने केली होती. या कारवाईबाबत किमान प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले होते. मात्र जालना शहरातील जुना जालना परिसरातील कुचरवटा भागात झालेल्या कारवाईबाबत (पान २ वर...)

## नीट पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

### जालन्यातून सामाजिक कार्यकर्त्यांची कठोर कारवाईची मागणी

जालना । प्रतिनिधी

देशभरात वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याची तीव्र भावना व्यक्त होत असून या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जालन्यातून करण्यात आली आहे. ३ मे २०२६ रोजी पार पडलेल्या परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा आरोप होत असून यामुळे तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांचे आयुष्य पणाला लागल्याचे



निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणामुळे अनेक हुशार विद्यार्थी मानसिक तणावाखाली गेले असून काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या बातम्यांमुळे पालक आणि समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांना जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित करत संबंधित दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पेपरफुटी प्रकरणात शासनाने काही आरोपींना अटक केली असली तरी संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. राज्यातील अनेक मान्यताप्राप्त महाविद्यालये केवळ विद्यार्थ्यांच्या (पान २ वर...)

## संपादकीय

### वसतीगृह की विद्यार्थ्यांची शिक्षा?

जालना शहरातील संत रामदास शासकीय मुलांचे वसतीगृह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृह यांची सध्याची अवस्था पाहिली तर शासनाच्या सामाजिक न्याय व्यवस्थेचा खरा चेहरा समोर येतो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उभारण्यात आलेल्या या वसतीगृहांमध्ये आज विद्यार्थ्यांना सुरक्षित निवास, स्वच्छ वातावरण आणि मूलभूत सुविधा मिळणेही कठीण झाले आहे. शिक्षणासाठी घरापासून दूर आलेल्या विद्यार्थ्यांना ज्या ठिकाणी आधार मिळायला हवा, त्या ठिकाणी त्यांना अक्षरशः नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. एका बाजूला शासन शिक्षण हाच विकासाचा पाया असल्याचे सांगते, तर दुसऱ्या बाजूला त्याच शिक्षणासाठी झगडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. पावसाळा सुरू होण्याआधीच वसतीगृहांच्या छतांमधून पाणी गळू लागते, खोल्यांमध्ये पाणी साचते, खिडक्या तुटलेल्या असतात, पंखे बंद असतात आणि डासांपासून बचाव करण्यासाठी विद्यार्थ्यांना कपडे व गोण्या बांधाव्या लागतात. ही परिस्थिती केवळ प्रशासनाच्या निष्काळजीपणाची नाही, तर सामाजिक असंवेदनशीलतेचीदेखील आहे. विशेष म्हणजे, ही अवस्था एक-दोन दिवसांची नसून गेल्या चार वर्षांपासून कायम आहे. विद्यार्थी वारंवार निवेदने देतात, विनंत्या करतात, पण त्यांना मिळते ते फक्त आश्वासन. प्रशासनाला साधी खिडकी बदलण्याइतकी संवेदनशीलता नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. अधिकाऱ्यांच्या कार्यालयांच्या दालनांच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपयांचा निधी सहज उपलब्ध होतो, मात्र विद्यार्थ्यांच्या निवासासाठी निधी नसल्याचे कारण दिले जाते. हा विरोधाभास संतापजनक आहे. सामाजिक न्याय विभागाचे अस्तित्वच मागासवर्गीय, गरीब आणि वंचित विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी आहे. पण जर त्याच विभागाच्या अखत्यारीतील वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर हा विभाग नेमका कोणासाठी काम करतो, असा प्रश्न निर्माण होतो. शासनाने स्वाधार योजनेत विद्यार्थ्यांना राहण्याच्या जागेबाबत अनेक निकष लावले आहेत. अभ्यासासाठी पोषक वातावरण, पुरेसा प्रकाश, सुरक्षितता यांचा विचार केला जातो. मग शासकीय वसतीगृहांमध्येच हे निकष का पाळले जात नाहीत? याहून गंभीर बाब म्हणजे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या राजकीय नेत्यांचे आणि विद्यार्थी संघटनांचे मौन. स्वतःला चळवळीचे नेते म्हणवणारे अनेक जण या प्रश्नावर बोलायलाही तयार नाहीत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करणे तर दूरच, पण शासनाचे लक्ष वेधण्यासाठी साधे निवेदन देण्याची तसदीदेखील घेतली जात नाही. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निराशा आणि संताप वाढत आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याची भावना समाजात निर्माण होत आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. मात्र अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ढकलले जात नाही ना, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. गरीब कुटुंबातील विद्यार्थी मोठी स्वप्ने घेऊन शिक्षणासाठी शहरात येतात, पण त्यांना मिळते ती असुरक्षितता, अस्वच्छता आणि उपेक्षा. शासन आणि प्रशासनाने आता तरी जागे होण्याची गरज आहे.

# तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत.या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे, मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे) सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.



संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा ४१.७१ कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.


छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बाह्य वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर' परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, म्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

# ग्राहक बनून महिलांकडून ज्वेलर्सची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**




गेल्या काही महिन्यांपासून सोन्याच्या किमतीत झपाट्याने वाढ झालेली आहे, त्यामुळे सोने खरेदीदार चिंतेत आहेत. सोन्याचा दर वाढल्याने आता सोने चोरीच्याही घटना पहायला मिळत आहे. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर बाजारपेठेमध्ये ज्वेलरी दुकानात ग्राहक बनून आलेल्या महिलांकडून ८४ हजार ६०० रुपयांचे सोने लंपास केल्याची घटना घडली आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, नसरापूर मुख्य बाजारपेठेमधील पंडित ज्वेलर्स या दुकानात १३ तारखेला सायंकाळी सात ते आठ वाजण्याच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली. बाजारपेठेमध्ये नेहमीप्रमाणे ग्राहकांची मोठी गर्दी होती. याच संधीचा फायदा घेत पाच महिला आणि एक लहान मुलगा ग्राहक असल्याचा बहाणा करून दुकानात आले. सुरुवातीला दोन महिला आणि त्यांच्यासोबत एक लहान मुलगा दुकानात दाखल झाले. त्यांनी विविध सोन्याचे दागिने पाहण्यास सुरुवात केली. काही वेळानंतर आणखी तीन महिला दुकानात आल्या. त्यामुळे दुकानातील कर्मचाऱ्यांचे लक्ष वेगवेगळ्या ग्राहकांकडे वळले.

या महिलांनी नाकातील नथनी पाहण्याच्या बहाण्याने दुकानदारांकडून विविध डिझाईनची पाऊच हातात घेतली. त्यावेळी एका महिलेने अत्यंत शिताफीने नथनीचे पाऊच हातात घेत ते तिच्यासोबत असलेल्या मुलीच्या हातात दिले. संबंधित मुलीने काही क्षणांतच ते आधी आलेल्या महिलांसोबत असलेल्या लहान मुलाच्या हातात दिले. हा सर्व प्रकार इतक्या वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने घडला की दुकानातील कर्मचाऱ्यांना कोणताही संशय आला नाही. काही वेळाने संबंधित महिला आणि लहान मुलगा कोणतीही खरेदी न करता दुकानातून बाहेर पडले.

सुरुवातीला दुकान मालकांना चोरी झाल्याचा संशय आला नव्हता. मात्र काही दिवसांनी दुकानातील नथनी पाऊचची तपासणी करताना दोन पाऊच कमी असल्याचे पंडित ज्वेलर्सचे मालक विनय पंडित यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तात्काळ दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संपूर्ण चोरीचा प्रकार उघडकीस आला. सीसीटीव्हीमध्ये महिलांकडून अत्यंत चलाखीने चोरी केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या चोरीमध्ये अंदाजे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेले असून, त्याची किंमत तब्बल ८४ हजार ६०० रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेनंतर नसरापूर बाजारपेठेतील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे..

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी परिसरात मेडिकल दुकाने फोडण्याच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर घरफोडी तसेच चिमुकलीवरील अत्याचारासारख्या गंभीर घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पूर्वी राजगड पोलीस स्टेशन नसरापूर परिसरात असल्यामुळे पोलिसांची गस्त नियमित होत होती. मात्र पोलीस स्टेशन बाहेर गेल्यानंतर बाजारपेठेतील पोलिसांची उपस्थिती कमी झाली असून, त्यामुळे चोरी आणि गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे..

दरम्यान, नसरापूरमधील व्यापारी आणि ग्रामस्थांकडून राजगड पोलीस स्टेशन पुन्हा नसरापूर परिसरात सुरू करण्यात यावे, तसेच बाजारपेठेमध्ये रात्रीची गस्त वाढवून अशा टोळ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

# अमरावतीतील फैजला मृत्यू प्रकरणाला धक्कादायक वळण; पोस्टमार्टममध्ये खुनाचा खुलासा

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावती येथील सौदागरपुरा परिसरातील रहिवासी असलेल्या नवविवाहित फैजला जबिनच्या मृत्यू प्रकरणाला आता अत्यंत धक्कादायक वळण मिळाले आहे. फैजला हिचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने (हार्ट अटॅक) झाला नसून तिचा गळा आवळून खून करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. याबद्दलचा प्राथमिक शवविच्छेदन (पोस्टमार्टम) अहवाल नुकताच समोर आला आहे. या खळबळजनक प्रकरणाने अमरावती आणि नागपूर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी मृत महिलेचा पती, सासरे आणि भासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोघांना तात्काळ अटक केली आहे.

अमरावतीच्या सौदागरपुरा येथील फैजला जबिन हिचा विवाह नागपूर येथील तरुणाशी झाला होता. १५ मे रोजी पहाटेच्या सुमारास फैजलाचा नागपूर येथे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. तिच्या अमरावतीमधील आई-वडिलांना हा निरोप देण्यात आला होता. या धक्कादायक बातमीने मुलीच्या माहेरच्यांना मोठा धक्का बसला. त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून फैजला हिच्या मृतदेहावर अमरावती येथे अत्यंत दुःखी वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

फैजलावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर काही वेळातच तिच्या कुटुंबियांच्या हाती एक व्हिडिओ लागला. या व्हिडीओमध्ये मृत फैजला हिच्या मानेवर गंभीर जखमा असल्याच्या खुणा स्पष्टपणे दिसत होत्या. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर सासरच्या मंडळींनीच फैजला हिचा घातपात केला असावा, असा



संशय तिच्या माहेरच्यांना आला होता. याप्रकरणी त्यांनी विलंब न करता अमरावती येथील नागपुरी गेट पोलीस ठाणे गाठले. यानंतर सासरच्या मंडळींनीच फैजला हिची हत्या केल्याची तक्रार केली.

या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ पावले उचलली. मृतदेहाचे पुन्हा शवविच्छेदन करण्यासाठी जिल्हा दंडाधिकार्यांच्या परवानगीने स्मशानभूमीतून फैजला हिचा दफन केलेला मृतदेह जमिनीतून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर हा मृतदेह पुन्हा शवविच्छेदनासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन हॉस्पिटल) दाखल करण्यात आला.

यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने केलेल्या प्राथमिक शवविच्छेदन अहवालात फैजला हिचा मृत्यू नैसर्गिक नसून तिचा गळा आवळून खून करण्यात आले होते. या अहवालाने सासरच्या लोकांचा खोटेपणा उघडकीस आणला. हा शवविच्छेदन अहवाल समोर आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

मृत फैजला हिचा पती, सासरे आणि भासरा (दिरी) या तिघांविरोधात नागपूर आणि अमरावती पोलिसांच्या समन्वयाने गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यातील दोघा संशयितांना पोलिसांनी आधीच ताब्यात घेतले आहे. सध्या पोलीस आता या हत्येमागील मुख्य कारण काय, हुंड्यासाठी छळ होत होता की इतर काही कौटुंबिक वाद होता या दिशेने पुढील तपास करत आहेत.

## पान १ वरुन...

**वाळू माफियांच्या धाकाने...**

पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, संबंधित आरोपींवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप वाघमारे कुटुंबाने केला आहे. काही पोलीस कर्मचारी आणि वाळू माफियांचे मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळेच आरोपींकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोपही कुटुंबीयांनी केला आहे.

दि. १५ मे रोजी याच प्रकरणात गंभीर गुन्हा दाखल झाल्यानंतरही संबंधित संशयित आरोपींनी पुन्हा पीडित कुटुंबाच्या घरावर सशस्त्र हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही घटना रात्री उशिरा घडल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे संपूर्ण कुटुंबात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर वसंत वाघमारे यांचे कुटुंब एका लहान मुलासह मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास थेट जालना येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात पोहोचले. जीवाच्या भीतीने त्यांनी रात्रभर पोलीस अधीक्षक कार्यालयातच थांबून आश्रय घेतला.

सकाळी त्यांनी पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांची भेट घेत संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. तसेच संबंधित आरोपी आणि त्यांना मदत करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकरणात आम्हाला न्याय मिळावा आणि आमच्या कुटुंबाला संरक्षण द्यावे, अशी मागणीही वाघमारे कुटुंबाने केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे जिल्ह्यात वाळू माफियांच्या वाढत्या दहशतीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून ग्रामीण भागातील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

**वसतीगृह की भग्न इमारत?...**

मात्र गरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राहण्यासाठी सुरक्षित खोली व मूलभूत सुविधा देण्यासाठी शासनाकडे निधी नसतो का, असा संतप्त सवाल आता समाजातून उपस्थित होत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या विद्यार्थी संघटना आणि सामाजिक चळवळीतील नेतेही या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. ज्याचं त्याचं भागलं या मानसिकतेमुळेच विद्यार्थ्यांचे प्रश्न आजही प्रलंबित असल्याची चर्चा सुरू आहे.शिक्षणासाठी घरापासून दूर आलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक निवास देणे ही शासनाची जबाबदारी असताना जालना येथील वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना अक्षरशः जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. त्यामुळे तातडीने निधी उपलब्ध करून संपूर्ण दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा विद्यार्थ्यांचा संताप तीव्र आंदोलनाच्या रूपात बाहेर पडू शकतो, असा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे.

**राजकीय नेते आणि...**

मिळत नाही? विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी पोषक वातावरण आवश्यक असते, असे शासनच सांगते. मग शासकीय वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना नरकयातना का सहन कराव्या लागत आहेत? हा केवळ निष्काळजीपणा नसून सामाजिक अन्याय आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करून त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न तर होत नाही ना? असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेमधून उपस्थित होत आहे. शासनाने तात्काळ दखल घेऊन वसतीगृहांची दुरुस्ती करावी, अन्यथा विद्यार्थ्यांचा उद्रेक झाल्यास त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे काय...**

नाही. आंदोलन आणि संघर्षाच्या घोषणा करणाऱ्या संघटना नेमक्या अशा वेळी कुठे गायब होतात? हा प्रश्न आता विद्यार्थी आणि पालक विचारू लागले आहेत. हे मौन केवळ निष्क्रियतेचे आहे की मुद्दाम दुर्लक्ष करण्याचे? कारण चार वर्षांपासून विद्यार्थ्यांचे हाल सुरू असताना कोणत्याही मोठ्या लोकप्रतिनिधीने किंवा विद्यार्थी संघटनेने प्रभावी भूमिका घेतलेली दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि भवितव्याचा प्रश्न असताना सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून पुढे येणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या संतापाला सामोरे जाण्याची वेळ प्रशासनासह राजकीय नेत्यांवर येऊ शकते.

**बाबुराव गणपत मोहिते...**

जालना येथील सी.टी.एम.के. शाळेच्या बाजूला असलेल्या शेरी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती मोहिते परिवाराकडून देण्यात आली आहे.

**साडेचार लाखांची अवैध...**

यावेळी विविध स्टील कंपनींच्या ४ लाख ४९ हजार ९०० रुपयांच्या लोखंडी सळई जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी पोलीस कर्मचारी कृष्णा तंगे यांच्या फिर्यादीवरून चंदनझिरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**खंजर घेऊन दहशत...**

खैरे (वय ४२, रा. मस्तगड हनुमान टेकडी, जुना जालना) असे सांगितले. त्याची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्याकडून चिकटपट्टी लावलेली मुठ असलेला सुमारे ४५ सेंटीमीटर लांबीचा धारदार लोखंडी खंजर आढळून आला. हा खंजर जप्त करण्यात आला असून त्याची किंमत सुमारे ३०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी पोलीस कर्मचारी संजय शेषराव चव्हाण यांच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

**कथित ढिसाळ नियोजनामुळे...**

वृद्ध प्रवासी आणि महिलांना विशेष त्रास सहन करावा लागत असल्याचेही भाविकांनी म्हटले आहे. काही भाविकांनी आरोप केला की, तुम्हाला जायचे नसेल तर बसमध्ये बसून राहा, अशा भाषेत आयआरसीटीसीचे कर्मचारी बोलत आहेत. यामुळे यात्रेकरूंमध्ये संताप अधिक वाढला आहे. उन्हात तासन्तास थांबवून मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. भाविकांनी प्रशासनाकडे तातडीने योग्य नियोजन करण्याची मागणी केली आहे. आम्हाला इतरत्र फिरवू नये, थेट राजगीर किंवा पुन्हा बोधगया येथे नेण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच जर दर्शनाची व्यवस्था शक्य नसेल, तर किमान योग्य निवास आणि रात्री वेळेवर रेल्वे स्थानकावर पोहोचवण्याची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे आयआरसीटीसीच्या पर्यटन व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून धार्मिक पर्यटनासाठी येणाऱ्या प्रवाशांच्या सोयी-सुविधांबाबत प्रशासन किती गंभीर आहे, यावरही चर्चा सुरू झाली आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नावर खासदारांना...**

देवराज, गौतम लांडगे, डोंगरे, ज्ञानेश्वर इंगोले, राम मोरे, बबलू राजपूत, अजीम शेख, पप्पू काळे, परमेश्वर सुळसुळे, नितीन बचाटे, भरत शिंदे, राम पवार, रामनाथ देव्हडे, विक्रम चव्हाण, विजय राठोड यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

**गटखा कारवाईत सेटलमेंटची...**

कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. ही कारवाई नेमकी कोणत्या पथकाने केली, किती माल जप्त झाला आणि संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली, याबाबत पूर्णपणे गुप्तता पाळण्यात आल्याचे बोलले जात आहे. दोन्ही कारवायांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा असतानाही प्रत्यक्ष पंचनाम्यात कमी माल दाखवण्यात आल्याची चर्चा असून संबंधित विक्रेत्यांशी आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या कारवायांमागील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, जुना जालना परिसरातील कारवाईची कुठेही अधिकृत वाच्यता करण्यात आली नसल्याने संशय अधिक बळावत आहे. जिल्ह्यात अवैध गुटखा विक्रीविरोधात सातत्याने कारवाईचे दावे केले जात असले तरी अशा प्रकारच्या चर्चांमुळे पोलिस प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर परिणाम होत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करण्यात यावी, कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेल्या मालाचा तपशील सार्वजनिक करण्यात यावा आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई व्हावी, अशी मागणी आता नागरिकांतून होत आहे.

**नीट पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे...**

नावनोंदणीपुरतीच सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्यक्ष शिक्षण कोचिंग वर्गांमधूनच दिले जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. कोचिंग वर्गांचे चालक आणि महाविद्यालयांचे संस्थाचालक यांच्यातील संगनमतामुळेच पेपरफुटीसारखे प्रकार घडत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या व्यवस्थेमुळे मराठी शाळा नामशेष होत चालल्या असून विद्यार्थ्यांना भरमसाठ गुण देऊन कोचिंग वर्गांचा व्यवसाय वाढवला जात असल्याची टीकाही करण्यात आली आहे. यामुळे शासनाने कोचिंग वर्गांना अधिकृत मान्यता द्यावी किंवा अशा निष्क्रिय महाविद्यालयांवर कारवाई करून ती बंद करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर रसना देहेडकर, सुषमाताई पायगव्हाणे, परवीन आनंद, विद्याताई कुलकर्णी, सुनंदा बदनापूरकर, कमल तुल्ले, भारती नाईक, करुणा मोरे, रमेश देहेडकर, दिनकर घेवंदे आदींच्या सह्या आहेत.

# पालघर दुर्घटनेतील १२ जणांवर सामूहिक अंत्यसंस्कार

## मंगलकार्यासाठी निघालेले वऱ्हाड मृत्यूच्या दाढेत; लाखनपाड्यावर शोककळा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सोमवारी धानिवरी येथे एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी लोकांना घेऊन जाणाऱ्या ट्रकचा भीषण अपघात झाला होता. या ट्रकला एका कंटेनरने धडक दिली होती. यामध्ये साखरपुड्याला जात असलेले १०० जण जखमी झाले होते.

यापैकी १३ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर बापूगाव येथील लाखनपाड्यावर अक्षरशः स्मशानशांतता पसरली होती. काल दुपारी चार वाजता साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी मुलाचे सर्व नातेवाईक बापूगावातून निघाले होते. मात्र, गावातून बाहेर पडल्यानंतर काही अंतरावरच त्यांच्या ट्रकचा भीषण अपघात झाला. अपघातामध्ये मृत्यू झालेल्या १३ जणांपैकी १२ जणांवर आज लाखनपाडा येथे एकत्रच अंत्यसंस्कार करण्यात आले.

या अंत्यसंस्कारावेळी आपल्या आप्तेष्टांना निरोप द्यायला सर्व गावकरी लाखनपाडा येथे जमले होते. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार हेमंत सावरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार विलास तरे, आमदार विनोद निकोले, आमदार हरिश्चंद्र भोये हे घटनास्थळी उपस्थित होते. यावेळी १२ मृतदेह एका रांगेत ठेवण्यात आले होते. हे सर्वजण एकमेकांचे नातेवाईक होते. या अंत्यसंस्कारावेळी बापूगावातील वातावरण अत्यंत भावूक झाले होते. याठिकाणी स्त्रिया मोठमोठ्याने रडून आक्रोश करत होत्या. अंत्यसंस्कारावेळचे हे दृश्य अक्षरशः डोळे पाणावणारे होते. संपूर्ण गावातील लोक याठिकाणी मोठ्या संख्येने हजर होते. घरातील मंगलकार्यासाठी निघालेल्या १२



जणांचा अशाप्रकारे दुर्दैवी शेवट झाल्याने गावातील प्रत्येकाच्या मनाला चुटपूट लागून राहिली.

काल दुपारी चार वाजण्याच्या सुमारास साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी जवळपास १०० जणांचे वऱ्हाड बापूगाव येथून खडकीपाडा येथे जायला निघाले होते. धानिवरी खडकीपाडा येथे जाण्यासाठी महामार्गावर हॉटेल तुळशी येथून युटर्न घेऊन पुन्हा मागे यावे लागते. हा मोठा वळसा टाळण्यासाठी टेम्पो चालकाने धानिवारी पुलाखालून वळण घेतले. तेथून खडकीपाडा अर्ध्या किलोमीटरवर असल्याने टेम्पो चालकाने टेम्पो रॉंग साईडने नेला. त्यावेळी समोरुन येणाऱ्या कंटेनर दुभाजकावर चढून टेम्पोवर पडल्याने मोठा अपघात झाला.

आयशर ट्रकमध्ये क्षमतेपेक्षा जास्त म्हणजेच १०० हून अधिक वऱ्हाडी प्रवास करत होते. गाडीत असणारे सर्व वऱ्हाडी एकमेकांसोबत गप्पा मारत, मजा-मस्करी करत अत्यंत उत्साहाच्या वातावरणात लग्नाच्या आणि साखरपुड्याच्या गप्पांमध्ये रंगले होते. सर्वांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद होता. मात्र, नियतीच्या मनात काहीतरी वेगळंच होतं. वऱ्हाडाचा हा आयशर ट्रक नवरीच्या घराजवळ पोहोचलाच होता, तेव्हाच हा अपघात घडला आणि होत्याचं नव्हतं झालं.

## थोडक्यात...

### क्लबमधील व्हिडिओ व्हायरल; पब संस्कृतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील मुंढवा परिसरातील अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या 'बॅस्टियन' क्लब पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. क्लबमध्ये तरुण-तरुणींकडून अश्लील चाळे सुरू असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, त्यामुळे पुण्यातील पब संस्कृती पुन्हा चर्चेत आली आहे.

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये शेकडो लोकांच्या गर्दीत काही तरुण आणि तरूणी अश्लील कृत्य करताना दिसत आहेत. मोठ्या आवाजातील संगीत, मद्यधुंद वातावरण आणि सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या या प्रकारामुळे आणि व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे हा प्रकार सुरू असताना क्लबमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याचेही व्हिडिओमध्ये दिसून येत आहे.

मुंढवा परिसरातील या उच्चभ्रू क्लबमध्ये यापूर्वीही विविध कारणांमुळे वाद निर्माण झाले होते. आता पुन्हा एकदा व्हायरल व्हिडिओमुळे पुण्यातील पब आणि नाईटलाइफ संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सोशल मीडियावर या घटनेविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, अशा प्रकारांवर पोलिस आणि प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या 'बॅस्टियन' क्लबमध्ये तरूण तरूणी एकीकडे गाण्यावर नाचत असतानाच मागच्या बाजूला बसलेले काही तरूण तरूणी सर्वांसमोर अश्लील वर्तन करताना दिसत आहेत, आजुबाजूला असलेल्या गर्दीत देखील ते सोफ्यावरती बसून अश्लील कृत्य करताना दिसत आहे, यामुळे पालकांनी संताप व्यक्त केला आहे. तर तरूणांचा हा अश्लील चाळे करताना व्हिडिओ व्हायरल झाला आहे. पुण्यातील मुंढवा परिसरात बॅस्टियन नावाचं शिल्पा शेट्टीच्या क्लबमध्ये हा प्रकार समोर आला आहे. शेकडो लोकांच्या गर्दीत सुरू असलेला हा अश्लील प्रकार व्हिडिओमध्ये कैद झाला आहे.

### नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रशेखर बावनकुळे हे महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेल्याने रिक्त झालेल्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या महाराष्ट्र विधानपरिषद जागेसाठी भारत निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या जागेचा कार्यकाळ १ जानेवारी २०२८ पर्यंत आहे.

या निवडणुकीची अधिसूचना सोमवार, २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवार, १ जून २०२६ असून, अर्जांची छाननी मंगळवार, २ जून रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख गुरूवार, ४ जून २०२६ आहे.

या पोटनिवडणुकीसाठी मतदान गुरूवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी सोमवार, २२ जून २०२६ रोजी करण्यात येईल. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया गुरूवार, २५ जून २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील किमान ७५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे तसेच त्यातील ७५ टक्के मतदार अस्तित्वात असणे आवश्यक असते. या निकषांची पूर्तता न झाल्याने संबंधित पोटनिवडणूक आतापर्यंत घेता आली नव्हती. मात्र, आता हे निकष पूर्ण झाल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आयोगाला दिल्यानंतर आयोगाने पोटनिवडणूक घेण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली असल्याचे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## घरातील कपडे अचानक पेटल्याने खळबळ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे जादूटोणा आणि भानामतीच्या संशयाने खळबळ उडाली आहे. तालुक्यातील कारवाडी परिसरात एका घरात कपडे, कागदपत्रे आणि इतर वस्तूंना अचानक आग लागत असल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे.अमावस्येच्या रात्री घरासमोर लिंबू-मिरचीसह काही संशयास्पद वस्तू आढळल्याने जादूटोण्याची चर्चा रंगली आहे.सचिन रणधीर आणि साईनाथ रणधीर यांच्या घरात गेल्या काही दिवसांपासून हा प्रकार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. अचानक वस्तूंना आग लागत असल्याने कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातही नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

सचिन रणधीर यांच्या घरात मागेही साल २०२२ मध्ये असेच भानामतीचे प्रकार घडले होते. त्यानंतर त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मधुकर अनाप यांना पाचारण केले होते. त्यांनी त्यांना घरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर अनेक वर्षे असे प्रकार थांबले होते. आता पुन्हा त्यांच्या घरातील कपडे आपोआप पेटणे आणि शनिवारी अमावस्येला घराच्या दारात लिंबू मिरच्या टाकण्याचा प्रकार घडल्याचे सचिन रणधीर यांनी म्हटले आहे. या सर्व प्रकारामुळे ते घाबरुन गेले आहेत. त्यांच्या घरातील या अजब प्रकारामुळे आजूबाजूच्या शेजाऱ्यांमध्ये दहशत पसरली आहे.

संबंधित घटनेची माहिती मिळताच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष मधुकर अनाप यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली आहे. त्यांनी नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असे म्हटले आहे. कोणतीही घटना कारणाशिवाय घडत नाही. प्रत्येक घटनेमागे कारण असते. तसेच कपडे पेटणे वगैरे घटनांना वैज्ञानिक कारण असते. या कपड्यांवर केमिकल किंवा काही रासायनिक पदार्थ लपवलेले असू शकतात.

## महागाईने मरा किंवा जय श्रीराम म्हणत गप्प बसा; संजय राऊतांचा भाजपावर हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

पेट्रोल डिझेलच्या वाढलेल्या किंमतीच्या मुद्द्यावर शिवसेना नेते संजय राऊत यांनी नुकताच भाजपावर जोरदार टीका केली. संजय राऊत यांनी म्हटले की, पंतप्रधान सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. आसाम आणि पश्चिम बंगालच्या निवडणुकांनंतर पंतप्रधान भारतीय जनतेवर बोजा टाकून परदेश दौऱ्यावर गेले.

मोदींनी तुम्हाला सांगितले आहे की, तुम्हाला आता गरीब व्हावे लागेल मी श्रीमंत आहे.. अदानीचे खटले काढून घेतले अमेरिकेतून. अदानीवर जे खटके सुरू होते अमेरिकेत ते मोदींनी काढून घेतले. काय तडजोडी झाल्या ते त्यांना माहिती, देशाला माहिती. पण या देशात अजूनही अनेक लोक खोट्या खटल्यांखाली तुरूंगात आहेत. पण गौतम अदानी यांच्यावरील खटला मोदींनी काढून घेतला. पेट्रोल डिझेलच्या दरवाढीवर संजय राऊत यांनी जय श्रीराम म्हणत थेट प्रतिक्रिया देखील यावेळी दिली.




पुढे संजय राऊत यांनी म्हटले की, अदानीचा न्याय होतो, जागतिक पातळीवर. पण आम्हाला न्याय मिळत नाही शिवसेनेला. सुप्रीम कोर्टात. महागाई वाढलेली आहे, महागाई वाढणार आहे. महागाईमुळे या देशात, मध्यमवर्गीयांमध्ये एक भीतीचे वातावरण आहे. त्यातून एक आर्थिक अराजक निर्माण होईल आणि भारतीय जनता पक्ष म्हणेल हे मुस्लिमांमुळे होतंय.

हे पाकिस्तानमुळे होतंय. मग आमचे लोक कपाळाला टिळे लावून या महागाईचे स्वागत करतील आणि भाजपालाच मतदान करतील. लोक त्यांच्या कर्माची फळे भोगत आहेत. एक काळ असा होता की, महिला महागाई विरोधात मोर्चा काढायच्या. विद्यार्थी रस्त्यावर यायचे. महागाईविरोधात रस्ता रोखो व्हायचो. आंदोलने व्हायची.

आज अशाप्रकारची आंदोलने लोकांनी करणे हा मोदींच्या राजवटीत देशद्रोहाचा गुन्हा ठरतो. त्यांच्यावर खोटी कलमे टाकून त्यांना अटक केली जाते. काय करणार तुम्ही.. एकतर उपासमारीमुळे मेले पाहिजे तुम्ही शेतकऱ्यांप्रमाणे महागाईने नाही तर मग जय श्रीराम म्हणत गप्प बसायचे. भारतीय जनता पक्ष हा जमिनीवरचा पक्ष नाही. भारतीय जनता पक्षाची सरकार ही गैरमार्गाने आलेली सरकार आहे. ज्यावेळी भारतीय जनता पक्ष फेर निवडणुका घेईल, त्यावेळी कळेल की लोक कोणासोबत उभे आहेत.

## अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात रोज महिला मुलींवर अत्याचार होत आहे, अशा परिस्थितीत आता महिलांचं जगणं कठीण झालं आहे, कल्याण - डोंबिवली येथून देखील एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. कल्याण रेल्वे स्थानकात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचारची घटना ताजी असताना डोंबिवलीत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली आहे.

पण डोंबिवलीत घडलेली घटना अत्यंत धक्कादायक आहे, मुलांनी त्यांच्यासोबत नेमकं काय आणि कसं घडलं याबद्दल कोणाला काही सांगितलंच नाही अशात मोठं रहस्य समोर आलं आणि कुटुंबियांना देखील मोठ धक्का बसला. आता पोलिसांनी याप्रकरणी मोठी कारवाई केली आहे. एका प्रकरणात मानपाडा पोलिसांनी काजू निषाद या आरोपीला उत्तर




प्रदेशाहून अटक केली आहे. तर दुसऱ्या प्रकरणात रामनगर पोलिसांनी शुभम सरोज याला बेड्या ठोकल्या आहेत. धक्कादायक म्हणजे या दोन्ही प्रकरणात अल्पवयीन मुली गर्भवती झाल्यानंतर ही माहिती समोर आली. आहे. दोन्ही प्रकारात पोलिसांच्या तपास सुरू आहे.

कल्याण रेल्वे स्थानकात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचारची घटना ताजी असताना डोंबिवलीत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. खोपोलीत राहणाऱ्या आणि आपल्या मामाला भेटण्यासाठी अहिल्यानगर येथून आलेल्या एका १४ वर्षीय मुलीवर सौरभ सोनवणे याने लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. ज्यामुळे परिसरात खळबळ माजली आहे.

घटना उघडकीस येऊन काही तास लोटत नाहीत तोच डोंबिवलीमध्ये दोन ठिकाणी अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याची घटना समोर आली. विशेष बाब म्हणजे, या दोन्ही मुली गर्भवती राहिल्याने हा प्रकार समोर आला. प्रकरणातील दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. दोन्ही प्रकारात पोलिसांचा कसून तपास सुरू आहे.

सांगायचं झालं तर, देशाच्या कोणत्याच कोपऱ्यात आज मुली सुरक्षित नाहीत. शाळेत, बाहेर, क्लासमध्ये, नातेवाईकांकडे एवढंच नाही तर, घरात देखील मुली सुरक्षित नाहीत. आता तर एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. त्यामुळे मुली - महिलांनी जगायचं तरी असा प्रश्न उपस्थित आहे.

## पुण्यात धावत्या कारमध्ये महिलेवर अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यात चालत्या कारमध्ये महिलेवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. पुण्यातील मुंढवा कोरेगाव पार्क रस्त्यावरती ही घटना घडली आहे. मध्यरात्री एका हॉटेलमध्ये पार्टीसाठी आलेल्या महिलेला घरी सोडण्याच्या बहाण्याने कारमध्ये लैंगिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रात्री पार्टीत ओळख झालेल्या पुरुषाने घरी सोडतो म्हणून कारमध्ये नेलं आणि अत्याचार केला. पुण्यातल्या प्रसिद्ध कोरेगाव पार्क परिसरातील एका हॉटेल मधून महिला आणि पुरुष बाहेर पडले होते. या महिलेची आणि पुरुषाची ओळख पार्टीमध्ये झाली होती, त्यानंतर घरी सोडण्याच्या बाहण्याने पुरुषांनी महिलेवर अत्याचार केला आहे. कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनमध्ये या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रात्री पार्टीत ओळख झालेल्या पुरुषाने घरी सोडतो म्हणून नेलं आणि तिच्यावरती अत्याचार केला. धावत्या कारमध्ये त्या व्यक्तीने महिलेवर अत्याचार केल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरातील एका हॉटेल मधून महिला आणि पुरुष सोबतच बाहेर पडले होते. या महिलेची आणि पुरुषाची ओळख पार्टीमध्ये झाली होती, असे समोर आले आहे. पुरूषाने त्यानंतर घरी सोडण्याच्या बाहण्याने अत्याचार केल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास केला जात आहे.

या घटनेनं पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. तर काही दिवसांपूर्वीच पुण्यातील भोर जिल्ह्यातील नसरापूरमध्ये चिमुकलीवर अत्याचार करून हत्या केल्याची घटना ताजी असतानाच कोरेगाव पार्कमध्ये घडलेल्या या महिलेवरील अत्याचाराच्या घटनेमुळे संताप व्यक्त होत आहे. तर गेल्या काही दिवसांमध्ये गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.


# मुंबई विमानतळावर ३.१५ कोटींच्या सोन्याची तस्करी उघड

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क (कस्टम) विभागाने दोन वेगवेगळ्या कारवाई केल्या आहेत. यामध्ये तब्बल ३ कोटी १५ लाख रुपये किंमतीचे तस्करीचे सोने जप्त केले आहे. दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांना या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. यावेळी जप्त करण्यात आलेल्या सोन्यामध्ये २४-कॅरेट सोन्याची धूळ आणि कच्च्या सोन्याच्या तुकड्यांचा समावेश आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक जण उच्च उत्पन्न गटातील वित्त व्यावसायिक असून आंतरराष्ट्रीय तणावाच्या भीतीपोटी त्याने ही तस्करी केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

मुंबई कस्टम्स झोन-३ विमानतळ आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, १० मे रोजी 'एपीआयएस'प्रोफाइलिंगच्या आधारे पहिली कारवाई करण्यात आली. दुबईहून स्पाईसजेटच्या विमानाने (डक्ष५०२३) मुंबईत उतरलेल्या एका संशयित प्रवाशाला अधिकाऱ्यांनी अडवले. त्याची सखोल झडती घेतली असता त्याने मेणामध्ये २४-कॅरेट सोन्याची धूळ मिसळून ती पाऊचमध्ये लपवून आणल्याचे उघड झाले. जप्त करण्यात आलेल्या या सोन्याचे निव्वळ वजन १.०२ किलो आहे. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तात्पुरती किंमत १ कोटी ४१ लाख रुपये आहे.

तर दुसरीकडे दुबईहून एमिरेट्सच्या विमानाने (EK 506) आलेल्या एका प्रवाशाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. हा प्रवासी वित्तीय क्षेत्रात कार्यरत असलेला आणि उच्च उत्पन्न गटातील व्यावसायिक आहे. या चलाख प्रवाशाने सीमा शुल्क चुकवण्यासाठी सोन्याचे बारीक कच्चे तुकडे सिगारेटच्या पाकिटांमध्ये अत्यंत चाणाक्षपणे लपवले



होते. अधिकाऱ्यांनी त्याच्याकडून १.२५७ किलो वजनाचे २४-कॅरेट कच्चे सोने जप्त केले. ज्याची किंमत सुमारे १ कोटी ७४ लाख रुपये आहे. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

प्राथमिक चौकशी दरम्यान वित्तीय क्षेत्रातील आरोपी प्रवाशाने तस्करीमागे एक धक्कादायक कारण सांगितले. अमेरिका-इराण यांच्यातील वाढता संघर्ष आणि दुबईतील अलीकडील हल्ल्यांमुळे तिथली परिस्थिती अस्थिर झाली आहे. या भीतीपोटी मी दुबईतील माझी परदेशी मालमत्ता सोन्यात रूपांतरित केली. हे सोने भारतात आणताना कर आणि इतर नियामक तपासणी टाळण्यासाठी मी तस्करीचा मार्ग निवडला, असे त्याने सांगितले.

दरम्यान या दोन्ही आरोपींना सीमाशुल्क कायदा, १९६२ (Customs -ct, 1962) अंतर्गत अटक करण्यात आली आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये केवळ मालमत्ता सुरक्षित करणे हाच हेतू होता की यामागे एखादी मोठी आंतरराष्ट्रीय तस्कर टोळी सक्रिय आहे, याचा शोध घेण्यासाठी कस्टम्स विभागाचे अधिकारी पुढील तपास करत आहेत.

This letter is issued by the **Owner Pooja Vishal Ugale** and the **printer, publisher Achut Dagdu More** Printed at Jagamitra Offset Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna Taluka and District Jalna - 431203 (Maharashtra) And Published at Office Dainik Shubh Prabhat, H.No. 327, Om Shanti Galli, Near Mammadevi Kirana Store, Sambhaji Nagar Jalna, Taluka and District Jalna - 431203 (MAHARASHTRA) Editor **Achut Dagdu More,** Mob. No. 7020871500, **E-mail : dainikshubhprabhat@gmail.com PRGI Registration Number - MHMAR/25/A1228**

**हे पत्र मालक पूजा विशाल उगले आणि मुद्रक, प्रकाशक अच्युत दगडू मोरे यांनी जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजी नगर जालना, तालुका जिल्हा जालना - ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक शुभ प्रभात, घर नं. ३२७, मंम्मादेवी किराणा जवळ, ओम शांती गल्ली, संभाजी नगर, जालना. तालुका आणि जिल्हा जालना-४३१२०३ (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. संपादक : अच्युत दगडू मोरे, मो.नं. ९८५०५१६७२४, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1228, E-mail : dainikshubhprabhat@gmail.com**

## थोडक्यात...

### बुरोंडी येथे मच्छीमार जेट्टी उभारणी प्रस्तावास गती - मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

**मुंबई । प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील बुरोंडी येथे मच्छीमार जेट्टी उभारणीच्या प्रस्तावाला गती देण्यात आली आहे. बुरोंडी परिसरातील मच्छीमारांच्या विविध समस्या, जेट्टी उभारणीची आवश्यकता तसेच मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. बुरोंडी (ता.दापोली) मच्छीमार जेट्टी संदर्भात आयोजित बैठकीत मत्स्यव्यवसाय मंत्री राणे बोलत होते. यावेळी माजी आमदार सूर्यकांत दळवी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, केदार साठे, शिवानी गावकर, स्थानिक मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, रत्नागिरी जिल्हा महाराष्ट्रातील महत्वाचा सागरी जिल्हा असून जिल्ह्याला तब्बल २३७ किलोमीटरचा सागरी किनारा लाभला आहे. मिरकरवाडा बंदरानंतर दापोली तालुक्यातील हर्णे बंदराला विशेष महत्व आहे. हर्णे, दाभोळ आणि बुरोंडी ही मासळी उतरविण्याची प्रमुख केंद्रे मानली जातात.

बुरोंडी येथील मच्छीमारांच्या समस्या शासनाच्या निदर्शनास आल्या असून मच्छीमारांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि मत्स्य व्यवसाय अधिक सक्षम करण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. बुरोंडी येथे जेट्टी उभारल्यास वाहतूक खर्च कमी होईल, मासळीचा दर्जा टिकून राहील आणि स्थानिक मच्छीमारांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल. जेट्टीमुळे मच्छीमारांना मासळी थेट उतरविणे शक्य होईल. डिझेल, पाणी आणि इतर साहित्य सहज उपलब्ध होईल. वादळी हवामानात नौकांना सुरक्षित आश्रय मिळेल. तसेच पर्यटन आणि व्यापारानाही चालना मिळून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील असे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले. फिशरीज अँड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड (एफआयडीएफ) या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत हर्णे मत्स्य बंदर विकासाचे काम सुरू असून, त्याच धर्तीवर बुरोंडी येथेही आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे प्रयत्न केले जात आहे. बुरोंडी जेट्टी प्रकल्पामुळे दापोली तालुक्यातील मत्स्य व्यवसायाला मोठी चालना मिळणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांनी सांगितले.

बुरोंडी हे मोठे मच्छीमार गाव असून येथील लोकसंख्या ७ ते ८ हजारांच्या दरम्यान आहे. गावात नोंदणीकृत मच्छीमार सहकारी संस्था कार्यरत असून २५०२ सभासद या संस्थेशी जोडलेले आहेत. बुरोंडी परिसरात सुमारे १०० नोंदणीकृत मासेमारी नौका असून त्यामध्ये एक व दोन सिलेंडरच्या नौकांची संख्या अधिक असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची दिव्यांग व अनाथ मुलांच्या काष्ठ कलाकृती प्रदर्शनाला भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

गतिमंद व अनाथ मुलांचे पालक शंकरबाबा पापळकर यांनी मुंबईत आयोजित केलेल्या काष्ठशिल्प कलाकृतींच्या प्रदर्शनाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी भेट दिली व दिव्यांग कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृतींचे अवलोकन केले.

यावेळी राज्यपालांनी काष्ठशिल्प कलाकारांशी संवाद साधला तसेच शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी राज्यपालांना विविध काष्ठशिल्पांच्या वैशिष्ट्यांची माहिती दिली.

शंकरबाबा पापळकर तसेच पु. ल. देशपांडे अकादमीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांनी राज्यपालांचे स्वागत केले. पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. अंबादास पंत वैद्य बेवारस दिव्यांग बालगृह, वझ्झर, जिल्हा अमरावती येथील अनाथ मुलांनी सागवान व बेल आदी लाकडांपासून विविध काष्ठशिल्पे साकारली असून, या कलाकृती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

# दोन धारदार तलवारी जप्त

## दहशत माजवणाऱ्यांवर गुन्हे दाखल; चंदनझीरा पोलीसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरातील औद्योगिक व चंदनझिरा परिसरात धारदार तलवारी घेऊन दहशत निर्माण करणाऱ्यांविरोधात चंदनझिरा पोलिसांनी धडक कारवाई करत दोन जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

या कारवाईत दोन धारदार तलवारी जप्त करण्यात आल्या असून एका तरुणासह एका विधीसंघर्ष बालकावरही कारवाई करण्यात आली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १८ मे २०२६ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास औद्योगिक वसाहत परिसरात एक तरुण अवैधरित्या धारदार तलवार बाळगून दहशत निर्माण करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांचे पथक तातडीने आयकॉन स्टील चौक परिसरात दाखल झाले. तेथे सय्यद साबेर सय्यद निसार (वय २२, रा. नूतन वसाहत, जालना) हा हातात तलवार घेऊन जोरजोरात आरडाओरडा करत नागरिकांमध्ये भीती निर्माण करत असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेत त्याच्या ताब्यातील धारदार तलवार जप्त केली. याप्रकरणी पोलीस कर्मचारी रवि देशमुख यांच्या फिर्यादीवरून भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस कर्मचारी प्रशांत देशमुख करीत आहेत.

दरम्यान, दि. १७ मे २०२६ रोजी चंदनझिरा परिसरातील पद्मावती नगर भागात एक विधीसंघर्ष बालक तलवार बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन संबंधित बालकाच्या ताब्यातील धारदार तलवार जप्त केली. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक स्कॉट यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस कर्मचारी संतोष वनवे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक मारीयो स्कॉट, सय्यद, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मनसुब वेताळ, पोलीस कर्मचारी प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रविंद्र देशमुख आणि सागर खैरे यांनी सहभाग घेतला.

# माझी जात फक्त माणूस

## नाना पाटेकरांचे नागपुरात परखड वक्तव्य

**नागपूर । प्रतिनिधी**



ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर हे त्यांच्या रोखठोक मतांसाठी आणि बेधडक वक्तव्यांसाठी ओळखले जातात. नुकतंच नागपुरात झालेल्या एका कार्यक्रमात त्यांनी धर्म आणि जातीच्या राजकारणावरून डोळ्यांत अंजन घालणारं वक्तव्य केलं. या कार्यक्रमात मंचावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरीसुद्धा उपस्थित होते.

गडकरी साहेब, तुम्हाला माहितीये का माझी जात काय आहे, असा थेट सवाल यांनी या कार्यक्रमात केला. मी कधीच कोणाला माझी जात सांगितली नाही आणि मला त्याची गरजही वाटत नाही, असं ते स्पष्ट म्हणाले. या कार्यक्रमात त्यांनी इतर विषयांवरही भाष्य केलं. नागपुरातल्या रेशीमबाग इथल्या सुरेश भट सभागृहात 'जलक्रांती' परिषद आयोजित करण्यात आलं होतं. या परिषदेला पाणी फाऊंडेशनचा संस्थापक आणि अभिनेता आमिर, नाम फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि अभिनेते नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे उपस्थित होते. कार्यक्रमात नाना म्हणाले, मी माझी जात कधीच कुणाला सांगितली नाही. माझ्या आईने मला लहानपणीच एक गोष्ट शिकवली होती, जी मी आजपर्यंत पाळत आलोय. तुझी जात फक्त माणूस आहे आणि तुझा धर्म माणुसकी आहे, असं आई म्हणाली होती. त्यापलीकडे जाऊन स्वत:ची ओळख सांगण्याची गरज नाही. मुसलमान आणि हिंदू यांच्यातील फरक काय आहे, असा प्रश्न मी नेहमी आईला विचारायचो. त्यावर ती मला सांगायची की, हिंदू हात जोडून प्रार्थना करतात, तर मुस्लीम हात उघडून. आपल्या समाजातील जातव्यवस्था कधी संपणार नाही. जातीतील फरक ज्ञानाने आणि शिक्षणानेच संपवू शकतो. नानांच्या या भाषणानंतर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. यावेळी नाना पाटेकरांनी समाज आणि राजकारणात वाढणाऱ्या जातीयवादावर चिंता व्यक्त केली. माणसाची ओळख त्याच्या स्वभावावरून किंवा कर्तृत्वावरून नाही तर तो कोणत्या जातीत जन्मला यावरून ठरवली जाते, हे दुर्दैवी आहे. आपण माणूस म्हणून एकत्र यायला हवं.

# विवेकानंद सेवा केंद्राचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश




**परतूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विवेकानंद सेवा केंद्र, परतूर संचलित चार शाळांच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. विवेकानंद इंग्लिश स्कूल, विवेकानंद पब्लिक स्कूल परतूर, विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळा परतूर तसेच विवेकानंद इंग्लिश स्कूल केंधळी (मंठा) येथील एकूण ४२ विद्यार्थी पात्र ठरले.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक संदीप बाहेकर, मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे, प्रिन्सिपल श्री महाजन, श्री दंदाले, विष्णू बाहेकर, शिक्षकवृंद व पालकांनी केले. या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून विवेकानंद सेवा केंद्राचे कौतुक होत आहे.

शाळेने घेतलेल्या मेहनतीमुळे शाळेच्या गुणवत्तेचीही या निकालामुळे चर्चा होत आहे.


# वादळी वाऱ्यांमुळे मुंबई-अलिबाग जलप्रवास २६ मेपासून बंद

## मेरीटाईम बोर्डाचा प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय

**निलेश फुंडे । रेवदंडा**

कोकण किनारपट्टीवर सुरू असलेल्या वादळी वारे आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर गेट वे ऑफ इंडियाहून अलिबागच्या मांडवा येथे जाणारी प्रवासी जलवाहतूक यंदा नियोजित वेळेपेक्षा सहा दिवस आधीच बंद करण्यात येणार आहे. मेरीटाईम बोर्डाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार ही सेवा २६ मेपासून बंद राहणार असून, १ सप्टेंबरपासून पुन्हा सुरू केली जाणार आहे.

मुंबई ते मांडवा हा जलमार्ग राज्यातील सर्वाधिक प्रवासी वर्दळ असणाऱ्या मार्गांपैकी एक मानला जातो. दररोज साधारण तीन हजार तर सुट्टीच्या दिवशी आठ ते दहा हजार प्रवासी या मार्गाचा वापर करतात. गेट वे ऑफ इंडियापासून अलिबागपर्यंत अवघ्या दीड तासात पोहोचता येत असल्याने पर्यटक आणि स्थानिक प्रवासी दोघांमध्येही या सेवेला मोठी मागणी असते. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत पीएनपी, मालदार, अंजठा यांसारख्या खाजगी कंपन्यांच्या प्रवासी बोटी या मार्गावर धावतात.



पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो, मोठमोठ्या लाटा उसळत असतात. अशा स्थितीत गेट वे ऑफ इंडिया परिसरात बोटींना सुरक्षितपणे थांबवणे कठीण जाते. खोल समुद्रात हलक्या प्रवासी बोटींचे संचालन धोकादायक ठरू शकते. त्यामुळे प्रवाशांच्या जीविताच्या दृष्टीने ही सेवा दरवर्षी ठराविक कालावधीसाठी बंद ठेवण्याची पद्धत आहे. यंदा मात्र सततचा वारा आणि जोरदार पावसामुळे ही बंदी सहा दिवस आधीच लागू करण्यात आली आहे.

दरम्यान, गेट वे ऑफ इंडियाहून मांडवा दरम्यानची जलप्रवासी सेवा बंद होणार असली तरी भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो-रो सेवा मात्र नियमित सुरू राहणार आहे. त्यामुळे स्वतःच्या वाहनासह अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

मेरीटाईम बोर्डाने प्रवाशांनी पर्यायी प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन केले आहे. तसेच हवामानाचा अंदाज आणि समुद्री परिस्थिती पाहूनच पुढील निर्णय घेतले जातील, असेही बोर्डाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# ओबीसींची जातनिहाय जनगणना करा; घटनाबाह्य निर्णय रद्द करण्याची मागणी

**परतूर । प्रतिनिधी**



ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करण्यात यावी तसेच महाराष्ट्र मंत्रिमंडळाने खुल्या प्रवर्गातील जागांबाबत घेतलेला घटनाबाह्य निर्णय तात्काळ रद्द करावा, या मागण्यांसाठी परतूर-मंठा-नेर-सेवली ओबीसी भटके विमुक्त महासंघाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात १९३१ नंतर ओबीसींची जातनिहाय जनगणना टाळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, सध्याच्या जनगणनेतही याबाबत स्वतंत्र नोंद नसल्याने समाजात असंतोष असल्याचे नमूद करण्यात आले.

तसेच आरक्षित उमेदवारांना खुल्या जागेवर दावा करता येणार नसल्याचा निर्णय हा बेकायदेशीर व घटनाबाह्य असून ओपन इज ओपन फॉर ऑल या तत्त्वाचे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे शासनाच्या भुमीकेकडे लक्ष लागले आहे.




# महाराष्ट्र बदनाम नाही, तरुण पिढी ड्रग्जमुळे बरबाद होतेय

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हा छत्रपती शिवरायांचा, शाहू-फुले-आंबेडकरांचा आणि संतांच्या संस्कारांचा आहे. इतका थोर वारसा असलेला महाराष्ट्र कोणाच्या एका वक्तव्याने बदनाम होऊच शकत नाही. पण जेव्हा आम्ही 'बदनामी' शब्द वापरतो, तेव्हा ती राज्याच्या गौरवाबद्दल नसते, तर गल्लीबोळात पसरलेल्या ड्रग्जच्या भीषण वास्तवाबद्दल असते. विरोधकांनी प्रश्न विचारले की ती बदनामी, माध्यमांनी दाखवले की ती बदनामी... मग जनतेने काय मरायचे का? सत्य स्वीकारायला एवढी भीती का वाटते? असा संतप्त सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.



राजू शेट्टी यांनी देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून आक्रमक पोस्ट लिहिली आहे. यात त्यांनी महाराष्ट्रातील तरुण पिढी ड्रग्जच्या विळख्यात कशी बरबाद होत आहे, याचे अत्यंत भीषण वास्तव मांडले आहे.

राजू शेट्टी यांनी आपल्या पत्रात थेट गृहमंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणतात, ड्रग्ज विकणारे पेडलर्स आणि आंतरराष्ट्रीय रॅकेट चालवणाऱ्या मोठ्या माशांच्या मुसक्या आवळणे गरजेचे आहे. मुंबईचे किनारे असोत, पुण्याचे पब-कट्टा संस्कृती असो, नाशिक-संभाजीनगर सारखी शहरे असोत, शाळा-कॉलेज असोत की ग्रामीण भाग ड्रग्जचे जाळे आता प्रत्येकाच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचले आहे. तुम्ही मंत्रालयात बसून बदनामीची भाषा करत आहात, पण इथल्या झोपडपट्ट्यांपासून ते हाय-फाय सोसायट्यांपर्यंत, एका बापाची कमाई आणि आईचे कुंकू ड्रग्जच्या विळख्यात रोज जळून खाक होत आहे.

राज्यातील अनेक मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांतील तरुण मुले या ड्रग्जच्या विळख्यात अडकल्याचे सांगताना शेट्टी यांचीं दुःख आणि संताप अनावर झाला. आपली मुले डोळ्यांदेखत बरबाद होताना पाहून हतबल झालेले आई-बाप रात्री रडत आहेत. ही बदनामी नाही, हा त्या कुटुंबांचा आक्रोश आहे. ज्या हातांनी म्हातारपणी काठी व्हायचे, ते हात आज ड्रग्जच्या पैशांसाठी जन्मदात्या आई-बापाचा गळा आवळत आहेत. हे पाप कोणाचे? असा थेट आणि अंगावर येणारा सवाल त्यांनी व्यवस्थेला विचारला आहे.

राजू शेट्टी यांनी स्वतः प्रत्यक्ष ग्राउंडवर पाहिलेले भीषण वास्तव मांडताना सांगितले की, १४ ते २२ वयोगटातील पोरांनी हत्या केलेल्या मयतांच्या वारसांशी आणि आरोपी असलेल्या पोरांच्या आईबापाशी मी स्वतः बोललो आहे. त्यांच्याकडून वस्तुस्थिती ऐकल्यानंतर मी हादरून गेलो. दुनियादारी माहीत नसणाऱ्या ७ वी, ८ वीच्या खेड्यातील निरागस पोरांच्या हातात जेव्हा मी अमली पदार्थ पाहिले, तेव्हा ही व्यवस्था किती सडलेली आहे हे सत्य मला समजले. म्हणूनच जेव्हा नागरिक, माध्यमं किंवा विरोधक यावर बोलतात, तेव्हा तो केवळ राजकीय आरोप नसतो, ती आपल्या घरातील मुलाबाळांच्या सुरक्षेची चिंता असते.